# उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, यवतमाळ - ४४५००१

email- mh२९@mahatranscom.in
फोन क्रमांक -०७२३२-२५५१११

जा.क्र. 2004 /आस्था/उप प्रापका/यवत/२०१९
उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, यवतमाळ
दिनांक :- १६/०४/२०१९

प्रति,

मा. परिवहन उप आयुक्त (संगणक),
परिवहन आयुक्त कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**विषय :- मान्यताप्राप्त ऑटोरिक्षा/टॅक्सी स्टॅन्डची माहिती विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.**

**संदर्भ :-** मा.अपर परिवहन आयुक्त, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. पआका/का-१/मा.अ.अ./१०८/१८/२०१९ जा.क्र.४९८ दि. १५/०४/२०१९

मा.महोदय,

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुसार प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यवतमाळ यांच्या दि. १३/०८/२०१८ रोजीच्या सभेमध्ये विषय क्र. २ नुसार यवतमाळ शहरामध्ये एकुण ४० ऑटोरिक्षा स्टॅन्डला मान्यता देण्यात आली आहे. सदर इतिवृत्ताची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

आपले माहिती व उचित कार्यवाहीकरीता सविनय सादर.

**सोबत -** वरिलप्रमाणे

16/4

(राजेंद्र वाढोकर)
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
यवतमाळ

प्रत - मा.अपर परिवहन आयुक्त, परिवहन आयुक्त कार्यालय, म.रा.मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.

# प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यवतमाळ यांच्या दि. १३/०८/२०१२ रोजी दुपारी ४.०० वाजता संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त

प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यवतमाळ यांची सभा दि. १३/०८/२०१२ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यवतमाळ यांचे दालनात आयोजीत करण्यात आली. सभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्री. अश्विन मुद्‌गल साहेब, जिल्हाधिकारी, यवतमाळ | अध्यक्ष |
| २) | मा.श्री. रंजनकुमार शर्मा साहेब, जिल्हा पोलीस अधिक्षक, यवतमाळ | शासकीय सदस्य |
| ३) | श्री. गो.र.सैंदाणे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, यवतमाळ | सदस्य सचिव |
| ४) | श्री. नारायणराव मेहरे, अध्यक्ष, ग्राहक पंचायत, यवतमाळ | |
| ५) | श्री. राजु पडगिलवार, अध्यक्ष, ॲटोरिक्षा संघटना, यवतमाळ | |
| ६) | श्री. भारमल स्वामी, उपाध्यक्ष, ॲटोरिक्षा संघटना, यवतमाळ | |

सभेमध्ये खालील विषयांवर चर्चा होवून निर्णय घेण्यात आले.

**विषय क्र. १ :–** ॲटोरिक्षा व टॅक्सीच्या भाडे निश्चितीबाबत आणि यवतमाळ शहरात शेअर–ए–रिक्षा सुरू करण्याबाबत शासनाचे निर्णयानुसार.

**चर्चा :–** उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय यवतमाळ येथे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक पंचायत यवतमाळ चे पदाधिकारी व ॲटोरिक्षा संघटनेचे पदाधिकारी यांचे उपस्थितीत दि. ३/१२/२०११, दि. २८/५/२०१२ व दि. २०/६/२०१२ रोजी ॲटोरिक्षा व टॅक्सीच्या भाडे निश्चितीबाबत आणि यवतमाळ शहरात शेअर–ए–रिक्षा सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा होवुन यवतमाळ शहरात शेअर–ए–रिक्षाचे थांबे निश्चिती व प्रतिव्यक्ती दर भाडे ठरविण्यात आले. तसेच शहरातील मीटर रिक्षाचे दरभाडे सुध्दा ठरविण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) यवतमाळ बस स्टॅंड ते लोहारा | – अंतर ४ कि.मी. | – भाडे प्रती व्यक्ती १०/– |
| २) यवतमाळ बस स्टॅंड ते वडगांव | – अंतर २.५ कि.मी. | – भाडे प्रती व्यक्ती १०/– |
| ३) बस स्टॅंड ते शासकीय विद्यानिकेतन | – अंतर ३ कि.मी. | – भाडे प्रती व्यक्ती १०/– |
| ४) बस स्टॅंड ते कोहीनुर सोसायटी | – अंतर २ कि.मी. | – भाडे प्रती व्यक्ती १०/– |
| ५) बस स्टॅंड ते वैद्यकीय महाविद्यालय | – अंतर १.५ कि.मी. | – भाडे प्रती व्यक्ती ५/– |

याप्रमाणे शेअर–ए–रिक्षा प्रवासी भाडे निश्चित करावे असे सर्वानुमते प्रस्तावित करण्याचे ठरले होते.

मागील आठवडयातील पेट्रोल डिझेल दरवाढ लक्षात घेता दि. २०/६/२०१२ रोजी दु. १२.०० वाजता पुन्हा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयात सहा.प्रा.प.अ. यांचे उपस्थितीत व अध्यक्ष, जिल्हा ग्राहक पंचायत व शहर सचिव, जिल्हा ग्राहक पंचायत व ॲटोरिक्षा संघटना पदाधिकारी यांची सभा घेण्यात आली.

दि. २८/५/२०१२ रोजीच्या उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे दालनातील सभेमध्ये ॲटोरिक्षा दरभाडेवाढी संबंधी ॲटोरिक्षा संघटनेने खालीलप्रमाणे दरभाडेवाढ देण्याबाबत निवेदन सादर केले.

१) शेअर–ए–रिक्षा ०.५ कि.मी. पर्यंत रू. १२/– प्रमाणे प्रती व्यक्ती दर भाडेवाड मिळावी. (एका रिक्षात ३+१ आसन क्षमतेनुसार.)

२) मीटर प्रमाणे १ ल्या कि.मी. ला भाडे रू. २०/–

३) मीटर प्रमाणे १ ते २ कि.मी. ला भाडे रू. ३०/–

४) मीटर प्रमाणे २ ते ३ कि.मी. ला भाडे रू. ४०/–

५) मीटर प्रमाणे ३ ते ४ कि.मी. ला भाडे रू. ४५/–

उपरोक्त प्रमाणे दरभाडेवाढ मंजुर करण्यासाठी विनंती केली आहे.

उपरोक्त मागणीबाबत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय यवतमाळ येथील सभेमध्ये सविस्तर चर्चा होवुन यवतमाळ शहरातील शेअर–ए–रिक्षा मार्ग प्रस्तावित करण्यात येवुन ॲटोरिक्षा संघटनेने केलेली मागणी व बैठकीमध्ये प्रस्तावित केलेली दरभाडे वाढ प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या संभाव्य सभेमध्ये सादर करण्यात येईल व सभेचा निर्णय सर्वांना बंधनकारक राहील असे उप.प्रा.प.अ. यांनी सभेत सांगितले.

| शेअर–ए–रिक्षा | मार्ग अंतर कलोमीटर | ॲटोरिक्षा संघटना मागणी (प्रती व्यक्ती) | बैठकीत प्रस्तावित केलेली दरभाडे वाढ(प्रती व्यक्ती) |
|---|---|---|---|
| १) यवतमाळ बस स्टॅड ते लोहारा | ४ | रू.१२/– | रू.१०/– |
| २) बस स्टॅड ते वडगांव | २ | रू.१२/– | रू.१०/– |
| ३) बस स्टॅड ते पॉवर हाऊस (पांढरकवडा रोड) | २ | रू.१२/– | रू.१०/– |
| ४) बस स्टॅड ते आयटीआय कॉलेज | ३ | रू.१२/– | रू.१०/– |
| ५) बस स्टॅड ते मोहा फाटा | ५ | रू.१२/– | रू.१०/– |
| ६) बस स्टॅड ते डोर्ली फाटा | ३ | रू.१२/– | रू.१०/– |
| ७) बस स्टॅड ते भोसा रोड | ३ | रू.१२/– | रू.१०/– |

यवतमाळ शहरातील प्रवाशांकरीत मीटर रिक्षांचे दर ॲटोरिक्षा संघटनेची मागणी.

| | | |
|---|---|---|
| १) | १ ल्या कि.मी. ला किमान भाडे | रू. २०/– |
| २) | १ ते २ कि.मी. ला किमान भाडे | रू. ३०/– |
| ३) | २ ते ३ कि.मी. ला किमान भाडे | रू. ४०/– |
| ४) | ३ ते ४ कि.मी. ला किमान भाडे | रू. ४५/– |

दि. २८/५/१२ चे बैठकीमध्ये मान्यतेसाठी प्रस्तावित केलेली ॲटोरिक्षा दरभाडेवाढ

१ ल्या कि.मी. पर्यंत रू. २०/–

१ ते ३ कि.मी. पर्यंत रू. ३०/–

३ ते ५ कि.मी. पर्यंत रू. ४०/– प्रमाणे

सद्याचे पेट्रोल आणि डिझेल दरवाढ लक्षात घेवुन तसे जनतेची सोय लक्षात घेवुन दोघांनाही परवडणारी भाडेवाढ करणे आवश्यक असल्यामुळे बैठकीत प्रस्तावित केलेली भाडे दरवाढ मंजुरीसाठी प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे सादर करावी असे सहा.प्रा.प.अ. व जिल्हा ग्राहक पंचायत पदाधिकाऱ्यांनी सुचविले.

<u>कार्यवाही</u> :– यापूर्वी यवतमाळ विभागाचे प्रादेशिक परिवहन प्राधिकरण अमरावती हे एकच होते. मागील दि. १४/७/२०१० च्या सभेत रिक्षा मीटर दरपत्रक प्रादेशिक परिवहन प्राधिकरण अमरावती यांनी १ ल्या कि. मी. ला १० रू. व पुढे प्रत्येक कि.मी.ला ८ रू. हे ठरविले होते. त्यावेळी पेट्रोल दर रू. ५४.६८ होते.

आज पेट्रोल दर ७४.०५ रू. यवतमाळ शहरात आहेत. ही दरवाढ साधारणत: १.३५ पटीने वाढली आहे. म्हणुन ॲटोरिक्षा दरपत्रक १ ल्या कि.मी. ला १३.६० रू. पुर्णांकात रू. १४/— व पुढील प्रत्येक कि.मी.ला १०.९६ रू. म्हणजेच पुर्णांकात रू. ११/— ठेवणे संयुक्तीक वाटते आणि ते मंजुरीसाठी प्रस्तावित करीत आहोत.

वरिल मीटर रिक्षा दरास अनुसरून संघटनेने ठरविलेले एका स्थानापासुन दुसऱ्या स्थानापर्यंतचे शेअर—ए—रिक्षा दरपत्रक खालीलप्रमाणे प्रस्तावित करीत आहोत.

| | | |
|---|---|---|
| १) यवतमाळ बस स्टॅंड ते लोहारा | — अंतर ४ कि.मी. | — भाडे प्रती व्यक्ती १६/— |
| २) यवतमाळ बस स्टॅंड ते वडगांव | — अंतर २.५ कि.मी. | — भाडे प्रती व्यक्ती १२/— |
| ३) बस स्टॅंड ते शासकीय विद्यानिकेतन | — अंतर ३ कि.मी. | — भाडे प्रती व्यक्ती १२/— |
| ४) बस स्टॅंड ते कोहीनुर सोसायटी | — अंतर २ कि.मी. | — भाडे प्रती व्यक्ती १०/— |
| ५) बस स्टॅंड ते वैद्यकीय महाविद्यालय | — अंतर १.५ कि.मी. | — भाडे प्रती व्यक्ती १०/— |

उपरोक्त प्रमाणे ॲटोरिक्षा दरभाडेवाढ मंजुर करण्यास हरकत नाही.

निर्णय :— उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवुन विचाराअंती खालीलप्रमाणे शेअर—ए—रिक्षा मार्गाचे तसेच मीटर ॲटोरिक्षांचे भाडे दर ठरविण्यात आले व त्याबाबत सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्दी देण्याबाबत व प्रत्येक ॲटोरिक्षा थांब्यांवर ॲटोरिक्षा भाडे दरपत्रकाचे फलक लावण्याबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी ॲटोरिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सुचविले.

| | | |
|---|---|---|
| १) यवतमाळ बस स्टॅंड ते लोहारा | — अंतर ४ कि.मी. | — भाडे प्रती व्यक्ती १२/— |
| २) यवतमाळ बस स्टॅंड ते वडगांव | — अंतर २.५ कि.मी. | — भाडे प्रती व्यक्ती ०८/— |
| ३) बस स्टॅंड ते शासकीय विद्यानिकेतन | — अंतर ३ कि.मी. | — भाडे प्रती व्यक्ती १०/— |
| ४) बस स्टॅंड ते कोहीनुर सोसायटी | — अंतर २ कि.मी. | — भाडे प्रती व्यक्ती ०८/— |
| ५) बस स्टॅंड ते वैद्यकीय महाविद्यालय | — अंतर १.५ कि.मी. | — भाडे प्रती व्यक्ती ०५/— |

मीटर रिक्षाचे दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले.

१ ल्या कि.मी.ला रू. १२/— व त्यानंतरच्या प्रत्येक कि.मी.ला रू. १०/— प्रमाणे दरभाडे निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला.

बहुतांश ॲटोरिक्षाधारक हे सामान्य जनतेकडून जास्त भाडे घेतात असे नियमीत आढळते असे मा. जिल्हा पोलीस अधिक्ष यांनी सभेत सांगितले. अशा तक्रारी प्राप्त झाल्यास उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने त्याबाबत कठोर कारवाई करण्याचे मा. जिल्हा पोलीस अधिक्षक यवतमाळ यांनी सभेत सांगितले.

यवतमाळ शहरात/जिल्हयात बहुतांश ॲटोरिक्षा ह्या विधीग्राहय कागदपत्राअभावी चालत असल्याबाबत (टॅक्स न भरता, योग्यता प्रमाणपत्राचे नुतणीकरण न करता, परवाना नसतांना व विम्याशिवाय) उप प्रा.प.अ. यांनी ॲटोरिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना उद्देशुन सांगितले. यापुढे तपासणी मोहीमेत असे ॲटोरिक्षा आढळल्यास त्यांचेविरूध्द कठोर कारवाई केली जाईल. त्या अगोदर त्यांनी ॲटोरिक्षाची कागदपत्रे विधीग्राहय करून घ्यावी व या कामात ॲटोरिक्षा संघटनेने सहकार्य करावे अशी अपेक्षा उप प्रा.प.अ. यांनी व्यक्त केली.

विषय क्र. २ :— यवतमाळ शहरातील ॲटोरिक्षा थांब निश्चित करण्याबाबत.

१) मा.परिवहन आयुक्त म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. पआाका/का१/रि.टॅ.जि.प./प्रवासी

भाडे जा.क्र. ७५६८ दि. १२/६/२०१२ २) एमएडी०१९५/सीआर१७१अे/का—२(२) जा.क्र. ९८६७ दि. २७/७/२०१२ नुसार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यवतमाळ यांचे पोलीस निरीक्षक जि.वा.शाखा यवतमाळ यांना दिलेले पत्र क्र. १३३०/प्रापप्रा/उपप्रापअ/यवत दि. ६/७/१२ नुसार पो.नि. जि.वा.शा. यांनी सादर केलेल्या अहवालानुसार व नकाशानुसार जुन्या व नव्याने निश्चित करण्यात आलेल्या यवतमाळ शहरातील अॅटोरिक्षा थांब्यांना संख्यानिहाय मंजुरी मिळणेबाबत.

निर्णय :— त्याबाबत सविस्तर चर्चा होवुन यवतमाळ शहरातील नव्याने निर्माण करावयाच्या अॅटोरिक्षा थांब्यांना अॅटोरिक्षा संख्यानिहाय जुन्या अॅटोरिक्षांच्या थांब्या व संख्येसह मंजुरी प्रदान करण्यात आली. ती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | अॅटो थांब्याचे नांव | अॅटोंची संख्या |
|---|---|---|
| १. | आयटीआय व पॉलीटेक्नीक | ०५ |
| २. | कॉटन मार्केट | १० |
| ३. | स्टेट बॅंक चौक | २५ |
| ४. | पोस्ट ऑफीस चौक | २० |
| ५. | एसटी स्टॅंड चौक | ५० |
| ६. | विजय लॉज चौक | १० |
| ७. | बस स्टॉप | १७ |
| ८. | दत्त चौक | १५ |
| ९. | दाते कॉलेज चौक | १० |
| १०. | माईदे चौक | १० |
| ११. | स्वस्तिक चौक | १० |
| १२. | इतवारा चौक | १० |
| १३. | पाच कंदिल चौक | १० |
| १४. | गांधी चौक | २० |
| १५. | स्त्री रूग्णालय चौक | १५ |
| १६. | मेन हॉस्पीटल चौक | १५ |
| १७. | एसटी वर्कशॉप समोर | ०५ |
| १८. | सिंघानीया नगर चौक | ०५ |
| १९. | शारदा चौक | ०५ |
| २०. | सैफ स्टोअर्स समोर इंदिरा गांधी मार्केट | १० |
| २१. | बांगर नगर टी पॉईट | ०५ |
| २२. | जिल्हा न्यायालयासमोर | १० |
| २३. | शनि मंदिर चौक | ०५ |

यवतमाळ शहरातील मंजूर झालेले नविन अॅटोरिक्षा थांबे

| अ.क्र. | अॅटो थांब्याचे नांव | अॅटोंची संख्या |
|---|---|---|
| १. | गोधनी रोड (शासकीय विद्यानिकेतन समोर) | ०३ |
| २. | बाजोरीया नगर (सुळे यांचा प्लॉट) | ०२ |
| ३. | जामनकर नगर (विदर्भ हाऊसिंग सोसायटी) | ०३ |

| | | |
|---|---|---|
| ४. | श्री साई मंदिर (श्री.कावळे [illegible] प्लॉट) | ०२ |
| ५. | पांढरकवडा रोड नाका व पेट्रोल पंप (शिवानाथ एजंसीजवळ) | [illegible] |
| ६. | संदिप टॉकीज | ०५ |
| ७. | जिल्हा परिषद कार्यालयासमोर | ०३ |
| ८. | सागर क्रिडा मंडळ, सागर चौक | ०२ |
| ९. | सावरकर चौक (ठाकरे हॉस्पीटलजवळ) | ०५ |
| १०. | राणाप्रताप नगर गेट (आर्णी रोड) | ०५ |
| ११. | दर्डा नगर (पुष्पकुंज सोसायटीजवळ) | ०२ |
| १२. | नेताजी नगर चौक | ०५ |
| १३. | जयविजय चौक | ०४ |
| १४. | मेन हॉस्पीटल (मुख्य इमारत) | १० |
| १५. | मातोश्री सभागृह (दर्डा नगर) | ०४ |
| १६. | अग्रवाल ले–आऊट | ०५ |
| १७. | पोस्टल ग्राऊंडजवळ | ०३ |

**विषय क्र. ३ :—** मीटर टॅक्सी व ॲटोरिक्षा या वाहनांमध्ये चालकांची माहिती प्रवाशांना [illegible] दिसेल या पध्दतीने प्रदर्शित करणेबाबत.

उपरोक्त बाबतीत सविस्तर चर्चा होवून शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने कार्यवाही करावी. तसेच मीटर टॅक्सी व ॲटोरिक्षाधारकांना माहितीसाठी वर्तमानपत्रातुन प्रसिध्दी देवून, कार्यालयात त्यांच्या संघटनेची बैठक बोलावून त्यांना सुचना द्याव्यात व तारीख निश्चित करून त्यावर अंमलबजावणी करण्याचे मा. अध्यक्ष महोदयांनी सभेत सुचित केले.

**निर्णय :—** उक्त कार्यवाही ही तात्काळ सुरू करण्याबाबत ॲटोरिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना तसेच उप प्रा.प.अ. कार्यालय यांना सुचित करण्यात आले. ॲटोरिक्षा चालकांनी खालील मुद्दयांचे पालन करण्याबाबत आदेश देण्यात आले.

१) चालकांनी गणवेश व बिल्ला धारण करावा.

२) वाहनास परावर्तक न चुकता लावावे.

३) विधीग्राहय अनुज्ञप्ती व विधीग्राहय कागदपत्रे जवळ बाळगावी.

उक्त नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विरूध्द कठोर कारवाई करण्यात येईल याची ॲटोरिक्षाधारकांनी व चालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी असे मा. जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी सभेत सांगितले.

**विषय क्र. ४ :—** ॲटोरिक्षा मालक/चालक संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्र यांच्या विविध मागण्यांबाबत.

१) मा.परिवहन आयुक्त म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. एमव्हीआर०९११/सीआर१७१सी/का जा.क्र. ९५२३ दि. २१/७/२०१२ तसेच मा.जिल्हादंडाधिकारी यवतमाळ यांचे पत्र क्र. गृहशाखा/कालि/कावि/११५९ दि. १०/८/२०१२ नुसार

**निर्णय :—** ॲटोरिक्षा मालक/,चालक संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्र यांच्या विविध मागण्यांबाबत सविस्तर चर्चा होवुन त्यांच्या मागण्यांबाबत वेळोवेळी विचार करू. रास्त मागण्यांबाबत नियमांचे अधि[illegible] राहून त्यांचे हिताचा निर्णय घेण्याबाबत सभेमध्ये एकमत झाले.

**विषय क्र. ५ :—** शासकीय कार्यालयांमध्ये वाहन भाडयाने घेण्याकरीता दरनिश्चिती करणेबाबत.

दि. ८/७/११ ते ३/६/१२ पर्यंत पेट्रोल दरात ६७.३६ ते ७५.३७ पर्यंत कमी अधीक फरकाने वाढ झाली. डिझेल दर प्रति लिटर ४४.८५ एवढा कायम होता. माहे ऑगस्ट २०१२ पासुन हो दर ४४.८५ वरून ४६.०१ एवढा झाला. उक्त दरवाढ ही रू. १.१६ पैसे एवढयाने वाढली असल्यामुळे वाहनांच्या भाडयात किरकोळ भाडेवाढ होणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे दि. १/२/२०१२ रोजी प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यवतमाळ यांचे मंजुर झालेल्या दरपत्रकात वाहनांच्या निश्चित करण्यात आलेल्या दरात पुर्ननिश्चिती करण्यासाठी आजच्या सभेत प्रस्ताव सादर करीत आहे. सोबत भाडेदरपत्रक सादर करीत आहे.

**निर्णय :—** सद्याची झालेली डिझेल दरवाढ लक्षात घेता शासकीय वाहनांसाठी अस्तित्वात असलेले दरपत्रक लक्षात घेवुन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यवतमाळ यांनी शासकीय वाहनांसाठी नव्याने सादर केलेल्या दरवाढीचे दरपत्रक सर्वानुमते मंजुर करण्यात आले.द ते खालीलप्रमाणे

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | भाडे दर व१००कि.मी. इंधनविरहीत ३०० कि.मी. पर्यंत (२४ तासाकरीता) | भाडे दर ८ तास /८०कि.मी.साठीचा एकुण दर (इंधन चालक) आणि मदतनिससहीत रूपये | २४ तास साठीचा एकुण दर (इंधन चालक) आणि मदतनिससहीत रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | अँटोरिक्षा तीन चाकी | रू. ४००/— | रू. ८००/— | रू. १०००/— |
| २ | अँटोरिक्षा सहा आसनी | रू. ५२५/— | रू. १०५०/— | रू. १३००/— |
| ३ | होंडा सिटी | रू. ११२५/— | रू. १८५०/— किंवा रू.१८.५०/—प्र.कि.मी. | रू. २०००/— |
| ४ | करोला/ऑप्ट्रा/स्कोडा | रू. १२२५/— | रू. २०५०/— किंवा रू.२०.५०/—प्र.कि.मी. | रू. २३००/— |
| ५ | इंडिगो/अँसेंट/इस्टीम | रू. ८२५/— | रू. १२५०/— किंवा रू.१२.५०/—प्र.कि.मी. | रू. १४००/— |
| ६ | लान्सर/फोर्ड आयकॉन | रू. ८२५/— | रू. १३५०/— किंवा रू.१३.५०/—प्र.कि.मी. | रू. १५००/— |
| ७ | इंडिका एसी/इंडिका व्हीस्टा | रू. ६२५/— | रू. १०००/— किंवा रू.९.५०/—प्र.कि.मी. | रू. ११००/— |
| ८ | इनोव्हा/तवेरा/स्कार्पिओ/झायलो | रू. १०२५/— | रू. १३५०/— किंवा रू.१५.५०/—प्र.कि.मी. | रू. १५००/— |
| ९ | जीप/टाटा सुमो/कॉलीस/ट्रॅक्स/क्रूझर | रू. ७२५/— | रू. १०५०/— किंवा रू.१०.५०/—प्र.कि.मी. | रू. १६००/— |
| १० | टेम्पो (चार चाकी) | रू. ६२५/— | रू. १४५०/— किंवा रू.१८.५०/—प्र.कि.मी. | रू. १७००/— |
| ११ | टेम्पो (सहा चाकी) | रू. ७२५/— | रू. १६५०/— | रू. १९००/— |
| १२ | ट्रक (सहा चाकी) | रू. १४२५/— | रू. २२५०/— | रू. २५००/— |
| १३ | ट्रक (दहा व बारा चाकी) | रू. १८२५/— | रू. २६५०/— | रू. २९००/— |
| १४ | बस १७ आसनी | रू. १६२५/— | रू. २१५०/— | रू. २५००/— |
| १५ | बस ३० आसनी | रू. २४२५/— | रू. ३१५०/— | रू. ३५००/— |
| १६ | ॲम्ब्युलन्स (चार चाकी) | रू. ९२५/— | रू. १५५०/— | रू. २१००/— |
| १७ | ॲम्ब्युलन्स (सर्व सुविधा उपलब्ध) | रू. ९२५/— | रू. १५५०/— | रू. २१००/— |

२४ तासात १०० कि.मी./बस बाबत २०० किमी. पेक्षा जास्त धाव झाल्यास जास्तीच्या धावेसाठी प्रति.कि.मी. भाडे देय होईल. २४ तासापेक्षा जास्त वेळ लागल्यास पुढील १२ तासापर्यंत निम्मे भाडे देय होईल. १२ तासापेक्षा जास्त वेळ लागल्यास पुर्ण भाडे देय होईल.

**विषय क्र. ६** :— मो.वा.क्र. एमएच२९/टी–८२२२ अॅटोरिक्षा टॅक्सी ३+१ नविन परवाना देणेबा
वाहन मालक श्री. पंकज हरिश्चंद्र नामेकर, रा. लोहारा, ता.जि. यवतमाळ य

अर्ज दि. १७/१०/२०११ नुसार

अर्जदार श्री. पंकज हरिश्चंद्र नामेकर, रा. लोहारा, ता.जि. यवतमाळ यांचे अर्जानु अॅटोरिक्षा ३+१ आसन क्षमतेसाठी यवतमाळ ग्रामीण भागासाठी यांना दि. १२/८/२००९ रोजी परव मंजुरीपत्र दिले होते. त्यानुसार त्यांनी दि. १३/१०/२०१० रोजी नविन अॅटोरिक्षा नोंदणी क्र. एमएच२९/ट ८२२२ हा नोंदणी केला. परंतु सदर वाहनधारकाने पक्क्या परवान्यासाठी कार्यालयात वाहनाचे कागद मुदतीत सादर केली नाहीत. (नोंदणी पुस्तिका, विमा, परवाना मंजुरीपत्र) त्यामुळे सदर वाहनास परव देण्यात आला नाही. दि. १७/१०/११ रोजी वाहनधारकाने वाहनांची कागदपत्रे तसेच वसंतराव शासव वैद्यकीय महाविद्यालय यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करून वाहनमालक दि. २९/५/२०१० पा वैद्यकीय उपचाराखाली असल्यामुळे कागदपत्रे सादर करू शकला नाही असे त्याचे म्हणने आहे. वाहन बॅंक ऑफ इंडिया, दर्डानगर ब्रॅंच यवतमाळ यांचे तारण आहे.

**कार्यवाही** :— वाहन हे विहीत मुदतीत परिवहन संवर्गात नोंदणी झाले असल्यामुळे व परिवहन संवर्गा नोंदणी क्रमांक असल्यामुळे तसेच वाहनावर तारण असल्यामुळे अर्जदाराच्या वैद्यकीय प्रमाणपत्राचा विनंती अर्जाचा विचार करून सदर वाहनास पुढील पाच वर्षाकरीता पक्का परवाना देण्यास हरकत ना मंजुरीसाठी सादर.

**निर्णय** :— उपरोक्त बाब लक्षात घेता परवाना घेण्यासाठी झालेल्या विलंबाची कारणे समर्थ असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास हरकत नसल्याचे मा. अध्यक्ष महोदयांनी सभेत सांगितले. त्याप्रमाणे उपप्रा.प.अ. कार्यालयाने नियमानुसार शुल्कासह कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

शेवटी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा सदस्य सचिव प्रादेशिक परिवहन प्राधिक यवतमाळ यांनी आभार मानून मा.अध्यक्ष महोदयांचे परवानगीने सभा संपल्याचे घोषीत केले.

मा.श्री. रंजनकुमार शर्मा
शासकीय सदस्य
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण
तथा
जिल्हा पोलीस अधिक्षक
यवतमाळ

श्री. जी.आर.सैंदाणे
सदस्य सचिव
प्रादेशिक परिवहन प्राधिक
तथा
उप प्रादेशिक परिवहन अधि
यवतमाळ

मा.श्री. अश्विन मुद्गल
अध्यक्ष
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण
तथा
जिल्हाधिकारी
यवतमाळ